MHAH220012972011

रे.मु.नं. ३३५/२०११
विठ्ठल राजाराम लबडे व इतर वि.
राजाराम श्रीधर लबडे व इतर

आदेश
(नि.क्र.४८ खाली)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदार/वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द सरस निरस मानाने वाटप करुन पृथ्थक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील प्रतिवादी क्र. ७ हे मयत झालेले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ७ चा वारस मुलगा नवनाथ किसन वाडवकर हे देखील मयत झालेले आहेत. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर दाव्याचा निकाल झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी श्रीगोंदा जिल्हा न्यायालयात दिवाणी अर्ज क्र. ३९/२०२१ दाखल केला होता, तो रद्द झाला असुन सदर हुकूमाविरुध्द प्रतिवादी यांनी ना. हायकोर्ट, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सेकंड अपिल क्र. ४४७/२०२२ सोबत दिवाणी अर्ज क्र. ११३९८/२०२२ दाखल केले होते त्यानुसार सदर दावा फेरचौकशीसाठी न्यायालयात दि. ०३/१२/२०२५ रोजी बोर्डावर नेमण्यात आला. त्यामुळे सदर कालावधीत प्रतिवादी क्र. ७ व नवनाथ किसन वाडवकर चे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेता आले नाही. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्र. ७ व नवनाथ किसन वाडवकर यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास अबेटमेंट सेट असाईड करण्यासाठी विनंती केली आहे. प्र.वादी क्र. १ ते ३ तर्फे सदर अर्जावर म्हणणे दिले आहे व असे कथन केले आहे की, सदरचाअर्ज खरा व बरोबर नाही त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. वादीने अभिलेखावर प्रतिवादी क्र. ७ किसन संभु वडवकर मयत झाल्याबाबत नि.क्र.५४ खाली ग्रामपंचायत टाकळी खंडेश्वरी यांचा मृत्युचा दाखला दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्र. ७ चा वारस मुलगा नवनाथ किसन वडवकर मयत झाल्याबाबत नि.क्र.५५ खाली ग्रामपंचायत टाकळी खंडेश्वरी यांचा मृत्युचा दाखला दाखल केला आहे. प्र.वादी यांनी अर्जास स्पष्टीकरणासह आक्षेप नोंदवला नाही व प्रतिवादी क्र. ७ व नवनाथ किसन वडवकर यांचा मृत्यु झाल्याबाबत नाकारले नाही. वादीने त्याच्या अर्जासोबत शपथपत्र दाखल केलेले आहे. मयत प्रतिवादी क्र. ७ व नवनाथ किसन वडवकर यांचे वारसदार

अभिलेखावर घेण्याचे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. ७ व नवनाथ किसन वडवकर चे वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर माफीचा अर्ज मंजुर केला आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१) अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) वादीचा नि.क्र. ४८ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे. वादी विरुध्द झालेला दावा अबटेचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.12.12 18:19:15 +0530

(आर. बी. राऊत)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :१२/१२/२०२५.